


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३८४ वा | शनिवार दि ०६ जून २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# फडणवीस सरकारचा मोठा निर्णय; मराठा समाजाला ओबीसींसारख्याच ८ योजनांचा लाभ, हाकेंचा तीव्र आक्षेप

**वृत्तसंस्था मुंबई**

मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. ओबीसी समाजाला मिळणाऱ्या विविध योजनांच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल आठ कल्याणकारी योजना सुरू करण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन होता, त्यानंतर आता शैक्षणिक सवलतींसह विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा मोठा आणि ऐतिहासिक असा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मराठा समाजातील विद्यार्थी, युवक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयानुसार मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे कोणत्या योजना लागू केल्या गेल्या आहेत, पाहुयात. दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे. सध्या ही योजना ओबीसी विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. मराठा समाजातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक आणि वाहक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. इयत्ता नववी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही लागू होणार आहे. उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या विविध शुल्कांची रक्कम शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना परत दिली जाणार आहे. यामध्ये विविध शैक्षणिक खर्चांचा समावेश असेल. परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ महाराष्ट्रातील मराठा विद्यार्थी राज्याबाहेरील अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यास त्यांनाही या योजनेचा लाभ मिळेल. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पात्रता ओबीसी विद्यार्थ्यांना ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक सवलती मिळतात, त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठा समाजातील विद्यार्थीही पात्र राहतील. संस्थास्तरावरील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही लाभ केंद्रीय प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती मिळतील. भविष्यातील सर्व नवीन सवलती आपोआप लागू यापुढे ओबीसी प्रवर्गासाठी ज्या नवीन शैक्षणिक सवलती किंवा सुविधा जाहीर केल्या जातील, त्या स्वतंत्र आदेशाशिवाय मराठा समाजालाही आपोआप लागू होतील. ही या निर्णयातील सर्वात महत्त्वाची तरतूद मानली जात आहे. निर्णयावरून वादाची ठिणगी दरम्यान, सरकारच्या या निर्णयावरुन ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आक्षेप नोंदवला असून, ओबीसी समाजासाठी लागू असलेल्या योजनांचा विस्तार मराठा समाजापर्यंत करताना मूळ लाभार्थ्यांच्या हक्कांवर परिणाम होणार नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला आहे. मराठा समाजासाठी लोककल्याणकारी महाराष्ट्राच्या संकल्पनेतून कोणाची मागणी आली आणि त्यांच्या मागण्या पूर्ण करणे हा शासनाचा अधिकार आहे. पण ज्यावेळी ओबीसी आरक्षणाच्या धर्तीवरील सवलती मराठा समाजाला दिल्या जातात, त्यावेळी त्या ओबीसींच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या ठरू शकतात. लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून कोणाला काय द्यायचे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र जे मोर्चे काढू शकतात, सरकारवर दबाव आणू शकतात, त्यांच्या मागण्यांकडे अधिक गांभीर्याने पाहिले जाते. घटनात्मक पाया तपासल्याशिवाय निर्णय घेतले जातात, ही चिंतेची बाब आहे. ओबीसींसाठी असलेल्या योजनांमधून मराठा



समाजाला लाभ देणे म्हणजे मूळ ओबीसी समाजावर अन्याय करणारे ठरू शकते असे हाके म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी सांगितलं की, या निर्णयाचे स्वागत करण्यासारखे काहीही नाही. महाराष्ट्रात भटके, ओबीसी, दीनदलित असे अनेक समाजघटक आजही सामाजिक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र त्यांच्या मागण्यांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. जे आंदोलन करू शकतात, त्यांच्याच मागण्या वारंवार मंजूर होताना दिसतात. निवडणुकांवर प्रभाव टाकणाऱ्या समाजघटकांसाठी राज्याची तिजोरी खुली करायची का? सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सरकार कधी बोलणार? महाराष्ट्र हे एका समाजाचे राज्य नाही. राज्यात सर्वाधिक लोकसंख्या ओबीसी समाजाची आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना सर्व घटकांचा विचार होणे आवश्यक आहे.

# बंड झाली उदंड! ममताच आमच्या नेत्या, आम्ही अजिबात ऐकणार नाही; टीमसीच्या बंडखोर गटातच फूट

**वृत्तसंस्था कोलकाता**

शिवसेना , राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर पक्षातील बहुतांश आमदारांनी एकत्र येत एक गट तयार केला. या गटाला विधानसभा अध्यक्षांनीदेखील मान्यता दिली. बंडखोरी करुन तयार झालेल्या या गटातच आता बंडखोरी झाली आहे. त्यामुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात वेगळाच ट्विस्ट आला आहे. तृणमूलच्या अध्यक्षा आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आमदार ऋतब्रत बॅनर्जी आणि संदीपन साहा यांची पक्षातून हकालपट्टी केली. पक्षविरोधी कारवायांचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला. पण या दोघांना तब्बल ६० आमदारांची साथ मिळाली आणि तृणमूलमध्ये बंड झालं. पण या सगळ्या घडामोडींमध्ये आता एका नाट्यमय वळणाची भर पडली आहे. बंड करुन तयार झालेल्या गटातच आता बंडाळी झाली आहे. बंडखोर आमदारांनी पक्षात कायम राहण्यासाठी आता नेतृत्व परिवर्तनाचा सूर आळवला आहे. या मुद्द्यावरुन फुटीर गटातच फूट पडताना दिसत आहे. हावडाच्या पांचलाचे तृणमूल काँग्रेसचे आमदार गुलशन मलिक बंडखोर गटात आहेत. त्यांनी या संदर्भात महत्त्वाचं विधान केलं आहे. ममता बॅनर्जी केवळ मार्गदर्शक राहिल्या, त्यांनी नेतृत्व सोडलं, त्या आमच्या नेता नसतील, तर मग आम्ही ऐकणार नाही, असा आक्रमक पवित्रा मलिक यांनी घेतला आहे. हावडा जिल्ह्यातील पाच ते सहा आमदार याच मताचे असल्याचा दावा मलिक यांनी केला. त्या आमदारांशी बैठक झाली. नेतृत्त्वाबद्दल चर्चा झाली. ममता बॅनर्जी आमच्या नेत्या आहेत आणि त्यांना मार्गदर्शक करण्याची चर्चा केली जात आहे. आम्हाला ते मान्य नाही. ममता बॅनर्जीच आमच्या नेता आहेत आणि आधी हेच ठरलं होतं, असं मलिक यांनी ठासून सांगितलं. ममता बॅनर्जी फक्त मार्गदर्शक असतील, तर मग मी ऐकणार नाही, असं मलिक स्पष्टपणे म्हणाले. ममताच आमच्या नेत्या आहेत. हावडा जिल्ह्यातील पक्षाच्या ६ ते ७ आमदारांची हीच भूमिका आहे. आम्हाला ममता बॅनर्जी मार्गदर्शक म्हणून नव्हे, तर नेत्या म्हणून हव्या आहेत, असं मलिक म्हणाले. तृणमूल काँग्रेसमधील बंडखोर गटात ६० आमदार आहेत. या गटातील आमदारांनी त्यांच्या स्वाक्षऱ्यांचं पत्र विधानसभा अध्यक्षांना दिलं. ऋतूब्रत बॅनर्जी यांना विधानसभेचे विरोधी पक्षनेते करण्याची मागणी पत्रातून करण्यात आली. विधानसभा अध्यक्षांनी त्यांची मागणी केली. हा ममता बॅनर्जी यांच्यासाठी मोठा धक्का मानला गेला.

# दुखणे जटिल; दिलासा अपुरा



निवडणुकीच्या जाहीरनाम्यातील आश्वासन आणि अर्थसंकल्पातील घोषणांनंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले आहे. शेतकऱ्यांपुढील समस्यांचा डोंगर पाहता, त्यांना दिलासा देण्याची गरज होतीच. दोन लाख रुपयांपर्यंतची ही कर्जमाफी म्हणजे त्याच्या दुखण्यावरची मलमपट्टीच ठरेल. मात्र, तिजोरीची स्थिती पाहता हात किती मोकळे सोडायचे, याबाबत सरकारवरही मर्यादा होत्या. गेल्या वर्षी ही घोषणा केल्यानंतर प्रत्यक्ष मान्यता मिळण्यास मोठा विलंब झाला आहे. यापुढेही योजनेच्या पात्रतेचे निकष, अटी-शर्तींचे अडसर आणि अंमलबजावणीतील त्रुटी पाहता त्याचा लाभ कधी आणि किती शेतकऱ्यांना मिळेल, हाही मोठा प्रश्न आहे. विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या निर्णयाची अधिकृत घोषणा सरकारने केलेली नाही. सहकार विभागाकडून परिपत्रक आल्यावर नेमका तपशील समोर येईल. उपलब्ध माहितीनुसार ३० सप्टेंबर २०२५पर्यंतच्या थकीत पीककर्जापैकी दोन लाख रुपयांचे कर्ज ङ्गपुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेफ्अंतर्गत माफ होईल; तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. दोन वर्षांपूर्वी विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. गेल्या वर्षी अनेक जिल्ह्यांना अतिवृष्टीने तडाखा दिला. सुमारे ७० लाख हेक्टरवरील पिके उद्‌ध्वस्त झाली, शेतकऱ्यांची घरेदारे वाहून गेली आणि लाखो हेक्टर सुपीक जमीनही खरवडून गेली. त्यामुळे गेला खरीप आणि रब्बी हंगामही शेतकऱ्यांच्या हातून गेला. त्यामुळे कर्जमाफीबाबत सरकारवरही मोठा दबाव होता. त्यासाठी समिती स्थापना आणि प्रत्यक्ष निर्णय यांत एक वर्ष निघून गेले. कर्जमाफी आणि प्रोत्साहन मदतीचा सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. राष्ट्रीयीकृत, सहकारी बँका आणि सोसायट्यांची कर्जेही त्यातून माफ होतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्वीच स्पष्ट केले, हे बरे झाले. कर्जमाफी हा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एकमेव उपाय नसला, तरी तात्कालिक अडचणींतून बाहेर येण्यासाठी याची मदत होते. दुष्काळ-अतिवृष्टी अशा संकटांमुळे पीक हातून गेल्याने अनेक शेतकऱ्यांना कर्जफेड शक्य होत नाही. अशा थकबाकीदार शेतकऱ्यांना नवे कर्ज मिळत नाही आणि पुढील हंगामात पेरणीसाठी बियाणे-खते किंवा औषधांचाही प्रश्न उभा राहतो. अनेक शेतकरी मग सावकारांकडे धाव घेतात आणि दामदुपटीने फेड करूनही डोक्यावरील कर्जाचा डोंगर कायम राहतो. अशा वेळी काही दुर्दैवी जीव आत्महत्येसारख्या मार्गाने जातात. कर्जफेडीद्वारे खाते मोकळे झाल्यावर तो पेरणी करून पुढील तजवीज करू शकेल. यंदाही ङ्गएल निनोफ्मुळे अपुऱ्या पावसाचे अंदाज आहेत. त्यातच इराण युद्धामुळे विशेषतः युरियासारखी खते, बियाण्याची दरवाढ आणि मजुरीचा खर्चही वाढला असून, ट्रॅक्टरला डिझेल मिळवण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहेत. चहूबाजूंनी आलेल्या संकटांना तोंड देणाऱ्या शेतकऱ्याला या कर्जमाफीतून काहीसा दिलासा मिळेल. त्यावर आर्थिक तरतूद करून प्रत्यक्ष खाती मोकळी करणे आणि नव्याने पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना कर्ज मिळेपर्यंत आणखी दोन महिन्यांचा विलंब होणार आहे. आत्ताच पेरणीच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांना यंदाच्या खरिपात त्याचा लाभ कसा मिळणार, हादेखील मोठा प्रश्न आहे. गांजलेल्या शेतकऱ्यांना दोन लाखांची मर्यादा न घालता ङ्गसरसकटफ कर्जमाफी मिळावी, त्याचा सातबारा कोरा करावा, अशा शेतकरी नेत्यांच्या मागण्या होत्या. राज्याची आर्थिक स्थिती पाहता सरकार ते मान्य करण्याची शक्यता नव्हती. राज्यावरील कर्जांचा भार ११ लाख कोटी रुपयांवर गेला आहे. कर्जफेड-व्याज आणि वेतन यांवर अर्थसंकल्पातील ५४ टक्के भाग खर्च होत आहे; त्यातच ङ्गलाडकी बहीणफ्सारख्या योजनांसाठी ३६ हजार कोटी रुपये आणि आता कर्जमाफीसाठी ३५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रात जाहीर झालेली ही तिसरी कर्जमाफी योजना. ग्रामीण अर्थचक्र सुरू ठेवण्यासाठी ती उपयोगी ठरणार असली, तरी वारंवार कर्जमाफी व्यवहार्य नाही आणि शेतीप्रश्नावरील ते कायमचे उत्तरही नाही. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सिंचनव्यवस्था, शेतीमालाला योग्य भाव, पुरवठासाखळी आणि पारदर्शक पीक विमा असे दीर्घकालीन उपाय आहे. त्यासाठी राजकारण-लोकानुनय बाजूला ठेवून सांगोपांग विचार झाला पाहिजे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ठाकरेंना भिडलेला नेता चर्चेत; मोदी, शहांच्या निकटवर्तीयावर लवकरच मोठी जबाबदारी?

**नवी दिल्ली :** मुंबई महाराष्ट्राची नाही. ते आंतरराष्ट्रीय शहर आहे, असं वादग्रस्त विधान केल्यानं मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या रडारवर आलेले भाजपचे नेते के. अण्णामलाई पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. अण्णामलाई यांनी मुंबईत येऊन मुंबईबद्दल केलेलं विधान वादग्रस्त ठरलं. मनसे प्रमुख राज ठाकरेंनी अण्णामलाई यांचा शिवतीर्थावरील जाहीर सभेतून समाचार घेतला. यानंतर अण्णामलाई यांना राज ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं. त्यामुळे अण्णामलाईचं नाव देशभर चर्चेत राहिलं. यानंतर आता अण्णामलाई यांना लवकरच नवीन जबाबदारी मिळण्याची दाट शक्यता आहे.भाजप च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नवीन यांची नियुक्ती झाल्यानंतर पक्षानं पाच राज्यांमध्ये होऊ घातलेल्या





विधानसभा निवडणुकांची तयारी सुरु केली आहे. आसाममधील सरकार टिकवण्याचं आणि पश्चिम बंगालमध्ये सरकार स्थापन करण्याचं आव्हान भाजप समोर आहे. यासोबतच तामिळनाडू, पुदुचेरीतही निवडणुका होणार आहेत. तमिळनाडूत भाजपनं द्रमुकला बॅकफ ूटवर ढकलण्यासाठी अण्णाद्रमुकच्या नेतृत्त्वात एनडीएचा विस्तार केला आबे. २३ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी तामिळनाडूच्या दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी द्रमुकवर हल्लाबोल केला. याआधी गृहमंत्री अमित शहांनीदेखील द्रमुकला रडारवर घेतलं होतं. भाजप तामिळनाडूतील निवडणुकीसाठी गांभीर्यानं तयारी करत आहे. त्यात अण्णामलाई यांची भूमिका महत्त्वाची असेल.भाजपनं ४५ वर्षीय नितीन नवीन यांना राष्ट्रीय अध्यक्षपदी आणत पक्षाचं नेतृत्त्व नव्या पिढीकडे सोपवलं आहे. देशभरात तरुणांना पक्षात अधिकाधिक संधी देण्याच्या प्रयत्नात भाजप आहे. त्यामुळे अण्णमलाई यांची वर्णी नितीन नवीन यांच्या टिममध्ये लागण्याची शक्यता वाढली आहे. त्यांच्याकडे म हासचिवपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. भाजपनं अण्णामलाई यांना वरिष्ठ पदी संधी दिल्यास त्याचा फायदा पक्षाला तमिळनाडूत होऊ शकतो, असं राजकीय विश्लेषक सांगतात.अण्णामलाई यांनी याआधी तामिळनाडू भाजपचं प्रदेशाध्यक्षपद सांभाळलं आहे. सध्याच्या घडीला त्यांचं वय ४१ वर्षे आहे. नितीन नवीन यांच्या टिममध्ये त्यांची निवड केली जाऊ शकते. आयपीएस अधिकारी राहिलेले अण्णामलाई नोकरी सोडून राजकारणात आले. ते पंतप्रधान मोदी यांचे जवळचे मानले जातात. अण्णाम लाई यांना लवकरच राष्ट्रीय पातळीवर संघटनेत महत्त्वाचं पद मिळू शकतं, असं उच्चपदस्थ सुत्रं सांगतात. अमित शहांनी अण्णामलाई यांचं कौतुक केलं आहे.

## एकनाथ भाईनी धोका ओळखला, शिंदेसेनेची 'स्वतंत्र' खेळी

**मुंबई :** मुंबईचा महापौर कोण होणार याबद्दल बरीच चर्चा सुरु असताना महापालिका निवडणुकीत बहुमत मिळवणाऱ्या भाजप आणि शिंदेसेनेच्या नगरसेवकांची गट नोंदणीच अद्याप झाली नसल्याचं स्पष्ट झालं आहे. भाजप आणि शिंदेसेनेचा संयुक्त गट म्हणून



कोकण आयुक्तांकडे नोंदणी होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. पण आता असा संयुक्त गट तयार केला जाणार नसल्याची माहिती आहे.संयुक्त गट म्हणून नोंदणी झाल्यास शिंदेसेनेला पुढील ५ वर्षे महापालिकेत भाजपचंच धोरण अवलंबावं लागेल. त्यामुळे महापालिकेत शिंदेसेनेत स्वतंत्र अस्तित्व नष्ट होण्याचा धोका आहे. त्यामुळे शिंदेसेनेकडून त्यांच्या नगरसेवकांच्या गटाची स्वतंत्र नोंदणी केली जाणार असल्याचं सुत्रांची माहिती आहे. मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागून १० दिवस लोटले आहेत. निवडणुकीत भाजप आणि शिंदेसेनेला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. भाजपचे ८९, तर शिंदेसेनेचे २९ उमेदवार विजयी झाले आहेत. महायुतीला ११८ जागांवर यश मिळालं आहे. सत्ता स्थापनेसाठी ११४ चा आकडा गरजेचा आहे.निकाल लागून दीड आठवडा होत आला तरीही भाजप, शिंदेसेनेनं अद्याप कोकण आयुक्तांकडे गट नोंदणी केलेली नाही. महापौरपद, उपमहापौर, विविध वैधानिक आणि विशेष समित्या यांचं अध्यक्षपद आणि सदस्यत्व यावर भाजप, शिंदेसेनेच्या नेत्यांमध्ये चर्चा सुरु आहे. सर्वाधिक महत्त्वाच्या स्थायी समितीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची सदस्य संख्या समान येत असल्यानं विरोधकांची संख्या कमी करण्यासंदर्भात अभ्यास सुरु होता. सत्ताधारी आणि विरोधकांचे १३-१३ सदस्य स्थायी समितीवर सदस्य म्हणून जातील.भाजप आणि शिंदेसेनेच्या नगरसेवकांनी संयुक्त कोकण आयुक्तांकडे नोंदणी केल्यास सत्ताधारी पक्षाचा एक सदस्य वाढू शकतो.

## प्रकाश आंबेडकरांनी घेतली मोठी भूमिका

**नाशिक :** प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भाषणात न घेतल्याने नाशिकमध्ये म ोठा वाद निर्माण झाला आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यावर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी तीव्र शब्दांत निशाणा साधला असून, त्यांच्यावर 'ॲट्रोसिटी' अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची म ागणी केली आहे.नाशिकमध्ये ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात पालकमंत्री गिरीश महाजन यांनी उपस्थितांना संबोधित केले. प्रजासत्ताक दिन हा संविधानाच्या अंमलबजावणीचा दिवस असतानाही, महाजन यांनी आपल्या संपूर्ण भाषणात एकदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा उल्लेख केला नाही. पालकमंत्र्यांनी हे नाव जाणीवपूर्वक टाळले की ते विसरले, याबाबत संभ्रम असला तरी या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत.

## अंबादास दानवे यांना कोणत्या पक्षाकडून वारंवार पक्षप्रवेशाची ऑफर?

**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेना नेते तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांच्याबद्दल धक्कादायक वक्तव्य केलं. अंबादास दानवे लवकरच आमच्या पक्षात आलेले बघायला मिळतील, असं वक्तव्य उदय सामंत यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. त्यांच्या या वक्तव्यावर अंबादास दानवे यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी उदय सामंत यांचा दावा फेटाळला. तसेच आपल्याला लोकसभा निवडणुकीपासून विविध पक्षांकडून पक्षप्रवेशाच्या ऑफर येत असल्याचं म्हटलं. पण अशा ऑफरला अर्थ नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.मला वाटतं उदय सामंत असं बोलले नाहीत. तुम्हाला स्पष्ट सांगायचं तर मी त्यांनाच फोन केला होता. मला त्यांनी सांगितलं की ते काय म्हणाले. त्यांचं वक्तव्य फार गंभीरपणे घेण्याची गरज नाही. मी शिवसेनाप्रमुखांचा शिवसैनिक आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात काम करणारा शिवसैनिक आहे. त्यांच्यावर रोज टीका करतो म्हणून त्यांना



पत्रकारांनी अशा पद्धतीने प्रश्न विचारला आणि त्यांनी म्हणून अशा पद्धतीने उत्तर दिलं. पण माझ्या टीकेचा जोर आणखी वाढेल हे देखील मी सांगतो. त्यांचं जे स्वप्न आहे ते पूर्ण होणार नाही', असं रोखठोक प्रत्युत्तर अंबादास दानवे यांनी दिलं.चर्चेला आपण काही करु शकत नाही. निश्चित काही लोकं मैत्रीमध्ये बसल्या-उठल्यावर बोलत असतात की, असं तसं. आता सगळेच लोक बोलत असतात. भाजपचे लोक ग्रामपंचायतीच्या लोकांनाही बोलत असतात', असं अंबादास दानवे म्हणाले.मला असं वाटतं मी संघटनेचं काम करणारा शिवसैनिक आहे. आता नाही तर मागच्या ३० वर्षांपासून काम करणारा शिवसैनिक आहे.

## भाईसाठी शिंदे सेना कडाडली! गणेश नाईकांच्या 'त्या' विधानाचा घेतला समाचार

**मुंबई :** राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत असले तरी, अंतर्गत वादाचे फटाके आता उघडपणे फुटू लागले आहेत. भाजप नेते आणि माजी मंत्री गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या बोचऱ्या टीकेमुळे शिवसेनेच्या (शिंदे गट) गोटात तीव्र संताप व्यक्त होत आहे. 'भाजपने परवानगी दिली, तर त्यांचे नामोनिशाण संपवून टाकू,' या नाईकांच्या आव्हानाला आता उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी सडेतोड उत्तर दिले असून, नवी मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.गणेश नाईकांच्या आव्हानावर पत्रकारांशी बोलताना शंभुराज देसाई यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली. ते म्हणाले की, 'राजकारणात कोणीच कोणाला कमी समजू नये.





एखाद्याला संपवण्याची भाषा जर कोणी करत असेल, तर समोरचे काही हाताची घडी घालून बसलेले नाहीत. आम्हालाही राजकारण कळते. जर आमच्या नेतृत्वावर अशी टीका झाली, तर वेळ आल्यावर आम्ही सुद्धा आमची भूमिका घेऊ आणि आमचा पक्ष नाईकांना तोडीस तोड उत्तर देईल.'शंभुराज देसाईनंतर आता शिवसेनेचे युवा आमदार, मंत्री योगेश कदम यांनी नाईकांना थेट शिंगावर घेतले आहे. 'गणेश नाईक स्वतः मूळचे शिवसैनिक आहेत, त्यामुळे शिवसैनिक काय करू शकतो हे त्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही,' अशा शब्दांत कदमांनी नाईकांना जुन्या आठवणींची आणि शिवसैनिक स्टाईलची आठवण करून दिली आहे.नंदुरबार दौऱ्यावर असलेल्या योगेश कदम यांनी गणेश नाईकांच्या विधानावर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, 'एक महानगरपालिका म्हणजे काय संपूर्ण महाराष्ट्र होत नाही. एका शहराचे राजकारण पाहून त्यांनी एवढी मोठी विधाने करू नयेत. गणेश नाईक यांनी आता स्वतःच्या भाषेवर आणि वागण्यावर आवर घातला पाहिजे.'

गणेश नाईकांच्या विधानावर बोलताना संजय शिरसाट यांचा पारा चढला. ते म्हणाले, 'गणेश नाईकांचं जरा जास्तच व्हायला लागलंय. नामोनिशाण मिटवायला हे काय नवी मुंबईचे डोंगर आहेत का? आम्ही जिद्दीने उभे राहणारे लोक आहोत. एकनाथ शिंदेंमुळे तुम्ही आज सत्तेत आहात, हे विसरू नका. देवेंद्र फडणवीस यांच्याकडून काय आदेश घ्यायचे ते घ्या, पण वारंवार अशा वल्गना करून तुम्ही मोठे होत नाही.'

शिरसाट पुढे म्हणाले की, 'आम्ही महायुतीचा धर्म पाळतोय याचा अर्थ असा नाही की आम्हाला काही कळत नाही. आमचा त्याग आहे म्हणून आज ही सत्ता आहे. शिंदेंना हलक्यात घेण्याची चूक करू नका, यावर मी स्वतः फडणवीसांशी बोलणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आईचा जीव घेतला, ३३ वर्षांचा लेक माऊलीच्या बॉडीशेजारी गोट्या खेळत बसला, महाराष्ट्र सुन्न

**अहिल्यानगर :** शहरातील सावेडी उपनगरात मंगळवारी दुपारी उघडकीस आलेल्या एका थरारक घटनेने संपूर्ण शहर सुन्न झाले आहे. पैशांच्या किरकोळ वादातून मुलाने स्वतःच्या आईचा अडकित्त्याने वार करत निर्घृण खून केला. त्यानंतर मृतदेहाशेजारी शांतपणे गोट्या खेळत बसल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. नवलेनगर परिसरातील गजानन मंदिरासमोरील भाड्याच्या खोलीत ही घटना घडली. बेबी सुधाकर गवारे (वय ६०) यांचा जागीच मृत्यू झाला असून, त्यांचा मुलगा सुहास सुधाकर गवारे (वय ३३) याला पोलिसांनी अटक केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सुहास हा आईकडे वारंवार पैशांची मागणी करत होता. मंगळवारी दुपारी पुन्हा पैशांवरुन दोघांमध्ये वाद झाला. संतापाच्या भरात सुहासने आईला बेडरुममध्ये डांबून ठेवत कैऱ्या कापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अडकित्त्याने डोक्यात वार केले. गंभीर जखमी झालेल्या बेबी गवारे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेनंतर आरोपीने दरवाजाला आतून खाट व धान्याच्या कोठ्या लावून घेतल्या आणि आईचा मृतदेह शेजारी असतानाच पलंगावर बसून गोट्या खेळत राहिला. हातातील कात्री, अडकित्ता आणि गोट्या खिडकीतून पोलिसांना दाखवत तो स्वतःशीच बडबड करत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

परिसरातील नागरिकांना संशय आल्याने त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. दरवाजा उघडण्यास सांगूनही आरोपी बाहेर आला नाही. सुमारे अर्धा तास समजूत काढल्यानंतर पोलिसांनी दरवाजा तोडून त्याला ताब्यात घेतले. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस निरीक्षक कल्पना चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

गवारे कुटुंब मूळचे कोपरगाव तालुक्यातील आहे. पतीच्या निधनानंतर बेबी गवारे या मुलासह सावेडीतील भाड्याच्या खोलीत राहत होत्या. त्या घरकाम करून संसार चालवत होत्या. आरोपी सुहास कोणते काम करत होता, याची स्पष्ट माहिती अद्याप समोर आलेली नाही. मयत महिलेची मुलगी सुवर्णा दिगंबर घुले यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## भिगवण अपहरण प्रकरणात मोठा ट्विस्ट! पीडित तरुणी आरोपींच्या संपर्कात

**पुणे :** पुण्यातील भिगवणमधील अपहरणाच्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. आई आणि भावाच्या डोळ्यात लाल मिरची पावडर फेकून २१ वर्षीय तरुणीचं अपहरण करण्यात आलं आहे. या घटनेनंतर संपूर्ण जिल्ह्यात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. मात्र पोलिसांच्या तपासात पीडित तरुणी आरोपींच्या संपर्कात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच दोन्ही आरोपी सख्खे भाऊ असल्याचे उघड झाले आहे. याबाबत पोलीस सखोल तपास करत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी चारच्या सुमारास लग्नाची खरेदी करून पीडित तरुणी, तिचा भाऊ आणि आईसोबत दुचाकीवरून घराकडे जात होते. या दरम्यान भिगवण शासकीय विश्रामगृहाच्या बाजूला दोन तरुणांनी त्यांची दुचाकी अडवून तरुणी, तिची आई आणि भावाच्या डोळ्यांमध्ये मिरची पूड टाकून तरुणीचे जबरदस्तीने अपहरण केले. घडलेल्या घटनेबाबत तातडीने पोलिसांना कळवण्यात आले. अपहरणाच्या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि घटनेची गांभीर्यता लक्षात घेऊन तपास सुरु केला आहे.

आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना केली आहेत. तसेच या प्रकरणी भिगवण पोलिस ठाण्यामध्ये दौंड तालुक्यातील जहीर हारुण शेख व आयान हारुण शेख यांच्याविरूद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी सांगितले की, किडनॅपिंगची केस आमच्याकडे आली आहे. अपहरण आणि चोरी अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पत्नीला संपवण्यासाठी दोन लाखांचा सौदा

**जळगाव :** कोर्टाने पत्नीला दरमहा २० हजार रुपये पोटगी देण्याचा आदेश दिल्यानंतर पतीने पत्नीला संपवण्यासाठी दोन लाख रुपयांची सुपारी दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पाचोरा तालुक्यातील नगरदेवळा येथे महिलेच्या घरावर पेट्रोल टाकून आग लावल्याच्या सणसणाटी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत पर्दाफाश केला. या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार पीडित महिलेचा पतीच असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोटगी टाळण्यासाठी दोन लाख रुपयांची सुपारी देऊन हा कट रचण्यात आल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह एका आरोपीला अटक केली असून त्यांच्याकडून नऊ चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. या घटनेत फिर्यादी किरण उमेश राऊळ आणि त्यांची आई नगरदेवळा येथील घरी झोपलेल्या असताना दोन अज्ञात इसमांनी तोंडाला रुमाल बांधून घराच्या मुख्य दरवाजावर पेट्रोल ओतून आग लावली होती. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## चुलतभावाचा जीव घेतल्याबद्दल आजन्म सक्तमजुरीची शिक्षा, सात वर्षांनी मुक्तता

**जळगाव :** मुंबई : दमण येथे फिरायला गेल्यानंतर चुलत भावाची शर्टने गळा आवळून हत्या केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरून आजन्म सक्तमजुरीची शिक्षा झालेल्या एका व्यक्तीला मुंबई उच्च न्यायालयाने सबळ पुराव्यांअभावी निर्दोष ठरवले आहे. त्यामुळे सव्वासात वर्षांच्या तुरुंगावासानंतर सुटकेचा दिलासा मिळाला आहे. भैयालाल सिंह असे त्याचे नाव असून ऑक्टोबर-२०१८ मध्ये अटक झाल्यापासून तो तुरुंगात होता. अन्य कोणत्या गुन्ह्याच्या प्रकरणात आवश्यकता नसल्यास त्याची त्वरित सुटका करावी, असे निर्देश न्या. सारंग कोतवाल व न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने छ. संभाजीनगर तुरुंग प्रशासनाला दिले.

सरकारी पक्षाच्या म्हणण्यानुसार, भैय्यालाल हा त्याचा चुलत भाऊ राम लखन व साथीदार आसन सिंग सुग्रीव यांच्यासोबत २ ऑक्टोबर २०१८ रोजी फिरण्यासाठी दमण येथे गेला होता. तेथील समुद्रकिनारी फेरफटका मारून फोटोग्राफरकडून फोटो काढून घेतल्यानंतर रामलखन व भैयालाल यांच्यात भांडण झाले. त्यावेळी भैयालालने रामलखनचा गळा आवळून त्याची हत्या केली. मद्याच्या अंमलाखाली असलेला सुग्रीव झोपला होता. भैयालालने जागे केल्यानंतर त्याला जाग आली, तेव्हा रामलखन कुठे दिसत नव्हता आणि भैयालालच्या अंगावर शर्ट नव्हता. रामलखन आधीच निघून गेल्याचे भैयालालने सांगितले. दुसऱ्या दिवशी सुग्रीवने मोबाइलवर खूप प्रयत्न करूनही रामलखनशी संपर्क होऊ शकला नाही. त्याचदिवशी पोलिसांचा त्याला दूरध्वनी आला आणि दमण पॉलिटेक्निक येथे राम लखनचा मृतदेह असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या अंगावर शर्ट गुंडाळलेला होता. भैयालालसोबतचा फोटोही तेथे पडलेला होता. नंतर पोलिसांना भैयालालच्या खोलीत रामलखनचे आधार कार्डही सापडले. तसेच, रासायनिक विश्लेषणात भैयालालच्या कपड्यांवरील चिखल घटनास्थळावरील चिखलाशी जुळला. या साऱ्या पार्श्वभूमीवर, पोलिसांनी खटला चालवल्यानंतर दमण सत्र न्यायालयाने भैयालालला १४ जुलै २०२२ रोजी दोषी ठरवत शिक्षा ठोठावली होती.

## आईकडे लपवले १२ लाख अन पोलिसांना सांगितलं 'घरफोडी झाली'

**नांदेड :** नांदेड शहरात घडलेल्या एका घरफोडी प्रकरणाने वेगळचं वळण घेतलं आहे. वकिलाकडून पैश्याचा तगादा सुरु असल्याने आणि पैसे देण्यास टाळण्यासाठी महिलेने घडफफोडीमध्ये लाखो रुपये चोरी झाल्याचा बनाव केला. पण, पोलिसांनी तपास करत महिलेचा हा बनाव उघडकीस आणला. भाग्यनगर पोलिसांनी फिर्यादी महिलेसह घरफोडी करणाऱ्या पाच जणांना अटक केली आहे. यात तीन महिलेचा समावेश आहे. विशेष म्हणजे फिर्यादी महिलेच्या मैत्रिणीनेचं इतर सहकार्यासोबत घरफोडी केली होती. वकिलाची फीस वाचवण्यासाठी फिर्यादी महिलेने केलेला हा बनाव सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.



मंगल पोशट्टी जांगलीवाड ह्या नंदी शहरातील कॅनॉल रोड येथील संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. शेतीच्या वाटणीत मंगल जांगीलवाड या महिलेला १२ लाख ५० हजार रुपये हिश्याला आले होते. वकिला मार्फत न्यायालयात दावा केला होता. दरम्यान, महिलेकडे लाखो रुपये असल्याची माहिती घरा शेजारी राहणाऱ्या स्मिता लक्ष्मण पौळ आणि संध्या किशनराव डोणगे या मैत्रिणीला मिळाली. १५ फेब्रुवारी रोजी या दोन्ही मैत्रिणीने आपल्या इतर सहकार्यासोबत घरफोडी करत लाखो रुपयाचे सोन्या चांदीचे दागिने लंपास केले. सदर महिलेने भाग्यनगर पोलीस ठाणे गाठत चोरीची तक्रार दाखल केली.

पोलिसांच्या डीबी पथकाने आनंद नामदेवराव जाधव (काबरानगर), राजेश लक्ष्मण पांचाळ (सिडको), पुजा दिपक नरवाडे (काबरानगर), स्मिता लक्ष्मण पौळ (संभाजीनगर), संध्या किशनराव डोणगे (संभाजीनगर) या पाच जणांना तुळजापूर येथून ताब्यात घेतले. विचारपूस दरम्यान आरोपीनी केवळ सोन्या चांदीचे दागिने चोरी केल्याची कबूली दिली. घरात पैसे चोरी केले नसल्याचे आरोपीनी सांगितले. त्यानंतर पोलिसांना संशय आला आणि फिर्यादी महिलेला विश्वासात घेऊन विचारपूस केली. तेव्हा महिलेने रोख रक्कम चोरी झाल्याचा बनाव केल्याचे उघडकीस आले. एका प्रकरणामध्ये वकीलाला फीस द्यायची होती, वकिलाकडून पैश्याचा तगादा सुरु होता, पैसे मागू नये म्हणून फिर्यादी महिलेने हा बनाव केल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी फिर्यादी महिले सह घरफोडी करणाऱ्या पाच आरोपीना ताब्यात घेतले आहे. वाटणीत महिलेला १२ लाखाहून अधिक रुपये हिश्याला आले होते. एवढी मोठी रक्कम घरात ठेवण्या ऐवजी मंगल जांगीलवाड यांनी पैसे आईकडे ठेवले होते. दरम्यान घरफोडीत पैसे चोरी झाल्याच सांगितल्यानंतर पोलिसांना सर्व काही संशयास्पद वाटत होते. त्यामुळे फिर्यादी महिला मंगल जांगीलवाड यांची कसून व क्रॉस पद्धतीने तपासणी केली तेव्हा फिर्यादीने सदरचे पैसे या पूर्वीच उमरखेड तालुक्यातील ब्राह्मणगाव येथे राहणाऱ्या आईकडे दिल्याचे समोर आले.

पोलिसांनी फिर्यादी महिलेच्या आईकडून साडेबारा लाख रुपये जप्त केले. ज्या पैशाची चोरी झालीच नाही परंतु चोरी झाल्याचा बनाव करणाऱ्या फिर्यादी महिला मंगल जांगीलवाड यांना गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे.

# सलग सहा पराभव आणि पंजाबचं पॅकअप; जेतेपदाचे दावेदार 19व्या हंगामातही रित्याहाती का परतले?

**मुंबई, वृत्तसंस्था :**

दमदार सांघिक प्रदर्शनासह यंदाच्या आयपीएल स्पर्धेत पंजाब किंग्ज संघाने सलग सात लढती जिंकल्या. प्लेऑफ प्रवेशासाठी त्यांना उर्वरित सात लढतीत केवळ दोन विजय मिळवणं आवश्यक होतं. पंजाबसाठी प्लेऑफ प्रवेश औपचारिकता मानला जात होता. ऐन भरात असतानाच पंजाबची गाडी रुळावरून घसरली. एक दोन नव्हे तर सलग सहा लढतीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात खेळणारा पंजाबचा संघ जेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. मात्र सहा पराभवांनी पंजाबची लयच हरपली. लखनौला नमवत पंजाबने प्लेऑफसच्या आशा जिवंत राखल्या. मुंबई इंडियन्सने राजस्थानला नमवलं असतं तर पंजाबचा प्लेऑफ प्रवेश पक्का झाला असता पण नियतीच्या मनात वेगळंच काही होतं. रविवारी राजस्थानने दिमाखदार कामगिरीसह मुंबईला हरवत प्लेऑफमध्ये प्रवेश केला. राजस्थानच्या विजयासह पंजाबचं आव्हान संपुष्टात आलं. भरधाव निघालेला विजयरथ गाळात रुतावा अशी पंजाबची गत झाली. सलग १९ हंगाम खेळूनही पंजाबचा संघ जेतेपदाविनाच परतणार आहे. पंजाबचं असं का झालं? तिन्ही आघाड्यांवर चांगली कामगिरी होत असताना घरी जाण्याची वेळ का ओढवली याचा घेतलेला आढावा.



धरमशाला इथे पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स सामन्यापूर्वी अर्शदीप सिंगने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या एका व्हिडिओत तिलक वर्माला 'ओये अंधेरे' म्हटल्याने वाद पेटला. वर्णभेदी टीकेनंतर नेटकऱ्यांनी अर्शदीपवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. अर्शदीप सिंग व्लॉगिंग करतो. सोशल मीडियावर तो अतिशय सक्रिय असतो. हलक्याफुलक्या पद्धतीचं कंटेंट तो करत असतो. टी२० प्रकारात भरवशाचा गोलंदाज असलेल्या अर्शदीपला यंदाच्या हंगामात लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. कामगिरीत घसरण होत असताना दुसरीकडे तिलकला उद्देशून आक्षेपार्ह उद्गारांमुळे त्याच्यावर प्रचंड टीका झाली. बीसीसीआयने हंगामादरम्यान जारी केलेल्या नव्या नियमावलीनुसार खेळाडूंनी युट्यूब चॅनल, व्लॉग, सोशल मीडिया यापेक्षा खेळावर लक्ष केंद्रित करावं. एकप्रकारे अर्शदीपला ही चपराक होती. पंजाब किंग्ज संघाच्या सोशल मीडिया हँडल्सने कंटेंट करताना थोडं भान राखायला हवं होतं. कोलकाताविरुद्धची लढत रद्द झाल्यानंतर मन मोठं म्हणून गुण दिला अशा आशयाचा व्हीडिओ शेअर केला. त्यांना तो व्हीडिओ डिलिट करावा लागला. ४९ वर ऑलआऊट होण्यावरून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला डिवचलं. संघ जिंकत असताना विनाकारण फाजील पद्धतीचं कंटेंट तयार करून त्यांनी प्रतिमा खराब केली.

कॅचेस विन मॅचेस अशी क्रिकेटमधली जुनी म्हण आहे. पंजाबला या उक्तीचा चांगलाच प्रत्यय घडला. झेल सोडण्याबाबत पंजाब किंग्ज संघाने कहर केला. उडालेल्या ५६ झेलांपैकी १६ झेल त्यांना टिपता आले नाहीत. फलंदाजांचं वर्चस्व राहिलेल्या या स्पर्धेत झेल सुटणं हे जणू पातकच आहे. शशांक सिंह याने सर्वाधिक म्हणजे ५ झेल सोडले. अनुभवी फिरकी गोलंदाज युझवेंद्र चहलने सातत्याने सापळे रचून झेल उडेल अशी परिस्थिती निर्माण केली. मात्र पंजाबच्या क्षेत्ररक्षकांनी बेसिक गोष्टीतच कच्चं असल्याचं सिद्ध केलं. कर्णधार श्रेयस अय्यरला शशांकला क्षेत्ररक्षणात लपवण्याची वेळ आली. शशांकचा वाण बाकी खेळाडूंनाही लागला. यामुळेच हंगामात पंजाबची कॅचिंग एफिशियन्सी ७१.४३ एवढी राहिली. झेलच्या बरोबरीने पंजाबने स्टंपिंगच्या काही संधीही वाया दवडल्या. हेनरिच क्लासन आणि इशान किशनसारख्या जबरदस्त फॉर्मात असणाऱ्या खेळाडूंचे झेल सोडणं पंजाबला चांगलंच महागात पडलं. पंजाबच्या विदेशी खेळाडूंनाही झेल सोडण्याची लागण झाली. पंजाबचे प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग हे जगातल्या अव्वल क्षेत्ररक्षकांपैकी एक मानले जातात. त्यांच्या संघानेच एवढे झेल सोडणं अगम्य योगायोग ठरला. यंदाच्या हंगामात चहलच्या गोलंदाजीवर झेल सुटले हे खरं पण त्याच्या गोलंदाजीतली धार कमी झाल्याचं स्पष्टपणे जाणवलं. १४ लढतीत चहलने १२ विकेट्स पटकावल्या. आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्यांच्या यादीत चहल अव्वल स्थानी आहे. अगदी आतापर्यंत चहलच्या गोलंदाजीवर धावा काढणं फलंदाजांना जड जात असे. मात्र यंदाच्या हंगामात चहलच्या गोलंदाजीवर सहजपणे धावा लुटल्या गेल्या. पंजाबने फिरकीवर लक्ष दिलं नसल्याचंही आकडेवारी सांगते. डावखुरा फिरकीपटू हरप्रीत ब्रार यंदाच्या हंगामात केवळ दोनच सामने खेळला. दुसऱ्या सामन्यात त्याने विकेट्स पटकावत आपली उपयुक्तता सिद्ध केली. पंजाबच्या फिरकीपटूंनी फक्त ५९ षटकं टाकली. यावरूनच फिरकी हा विषय त्यांनी ऑप्शनला टाकल्यासारखं जाणवलं. फिरकी असं नव्हे एकूणच गोलंदाजांनी पंजाबला गाशा गुंडाळायला लावला असं म्हटलं तर वावगं ठरू नये. पंजाबच्या गोलंदाजांनी ९वेळा २००पेक्षा जास्त धावा दिल्या. एका हंगामात एवढ्या धावा लूटू देण्याचा हा विक्रम आहे. अर्शदीप सिंग पंजाबच्या माऱ्याचा प्रमुख आहे पण यंदा तो पूर्णपणे भरकटलेला वाटला. दक्षिण आफ्रिकेच्या मार्को यान्सनवर पंजाबने विश्वास ठेवला पण ना त्याला धावा रोखता आल्या ना विकेट्स पटकावता आल्या.

# रोहित १०० % फिट, हे BCCIला माहितच नाही? दिग्गज खेळाडूचा मोठा खुलासा




**चेपॉक/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध वनडे आणि कसोटी सामन्याची मालिका खेळणार आहे. या दोन्ही मालिकांसाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तर वनडे क्रिकेटमध्ये तो अजूनही भारतीय संघाचा भाग आहे. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या मालिकेसाठी त्याला भारतीय संघात स्थान देण्यात आलं आहे. पण त्याच्या नावापुढे फुली आहे, याचा अर्थ असा की, रोहित खेळणार की नाही हे त्याच्या फिटनेसवर अवलंबून असणार आहे. बीसीसीआयच्या मते, रोहित शर्मा अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. दरम्यान मुंबई इंडियन्सचा मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धनेने रोहितच्या फिटनेसबाबत मोठी अपडेट दिली आहे.

रोहित शर्माने आयपीएल २०२६ स्पर्धेत दमदार सुरुवात केली होती. पण त्यानंतर त्याला ३ आठवडे दुखापतीमुळे मैदानाबाहेर राहावं लागलं होतं. त्यामुळे त्याला काही सामने खेळता आले नव्हते. त्यामुळे बीसीसीआयला अजूनही वाटतंय की, रोहित शर्मा पूर्णपणे फिट झालेला नाही. पण महेला जयवर्धनेने दिलेल्या माहितीनुसार, रोहित शर्मा १०० टक्के फिट आहे. पत्रकार परिषदेत बोलताना महेला जयवर्धने म्हणाले, "आमच्या फिटनेस टीमने दिलेल्या माहितीनुसार, रोहित शर्मा १०० टक्के फिट आहे. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरल्यानंतर आम्ही जरा काळजी घेत आहोत. टीम कॉम्बिनेशनमुळे त्याला आम्ही इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळवतोय. त्याच्या फिटनेसबाबत कुठलीही शंका नाही." यावरून हे तर स्पष्ट झालं आहे की, रोहित शर्मा पूर्णपणे फिट आहे. मग बीसीसीआयने त्याच्या नावासमोर स्टार का लावला? बीसीसीआयला रोहितच्या फिटनेसबाबत कुठलीही अपडेट मिळालेली नाही का? असे अनेक प्रश्न आता उपस्थित केले जाऊ लागले आहेत. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या मालिकेत रोहित खेळणार का? की फिटनेसमुळे बाहेर बसणार? हे पाहणं आता महत्वाचं ठरणार आहे.

# आयपीएल सामन्यांतील 'सलाम मुंबई'वर आक्षेप

**मुंबई/वृत्तसंस्था**

आयपीएलच्या मुंबईतील सामन्यांदरम्यान झळकणाऱ्या 'सलाम मुंबई' या घोषणेतील 'सलाम' या शब्दावर आक्षेप घेत त्याऐवजी 'नमस्कार' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करण्याची मागणी भारतीय जनता पक्षांच्या युवा मोर्चाने केली आहे.

'सलाम' या शब्दाला कवीवर्य मंगेश पाडगावकर यांनी आपल्या 'सलाम' या अजरामर कवितेतून मराठी साहित्य, सांस्कृतिक विश्वात वेगळेच वलय मिळवून दिले आहे. अत्यंत बोचऱ्या आणि तीक्ष्ण शब्दात 'सलाम' ही कविता राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर विडंबनात्मक भाष्य करते. हा शब्द मूळ अरबी असला तरी मराठीत आदरयुक्त वंदन, नमस्कार किंवा अभिवादन करण्यासाठी सहज वापरला जातो. उदाहरणार्थ सलाम ठोकणे. या शब्दाच्या वापरावर भाजयुमोचा आक्षेप आहे. 'मुंबईची संस्कृती व ओळख 'सलाम मुंबई' नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेशी सुसंगत 'नमस्कार मुंबई' अथवा 'नमस्ते मुंबई' अशी असली पाहिजे. त्यामुळे 'सलाम मुंबई' हा शब्दप्रयोग तात्काळ बंद करून त्याऐवजी 'नमस्कार' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करण्यात यावा, अशी मागणी भाजयुमोचे मुंबई अध्यक्ष दिपक सिंह यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे




अध्यक्ष अजिंक्य नाईक यांना पत्र लिहून केली आहे. मुंबई : आयपीएलच्या मुंबईतील सामन्यांदरम्यान झळकणाऱ्या 'सलाम मुंबई' या घोषणेतील 'सलाम' या शब्दावर आक्षेप घेत त्याऐवजी 'नमस्कार' किंवा 'नमस्ते मुंबई' या शब्दांचा वापर करण्याची मागणी भारतीय जनता पक्षांच्या युवा मोर्चाने केली आहे. 'सलाम' या शब्दाला कवीवर्य मंगेश पाडगावकर यांनी आपल्या 'सलाम' या अजरामर कवितेतून मराठी साहित्य, सांस्कृतिक विश्वात वेगळेच वलय मिळवून दिले आहे. अत्यंत बोचऱ्या आणि तीक्ष्ण शब्दात 'सलाम' ही कविता राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर विडंबनात्मक भाष्य करते.

# आकिब नबीला डावलल्याने माजी खेळाडू आगरकरांवर संतापले

**मुंबई/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ नंतर अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या वनडे आणि कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे. यामध्ये गुरनूर ब्रारसह ३ नव्या खेळाडूंना संधी दिली आहे. पण यामध्ये रणजी ट्रॉफीत ६० विकेट्स घेत जम्मू काश्मीरला पहिलं रणजी जेतेपद पटकावून देण्यात मोठी भूमिका बजावणाऱ्या आकिब नबीची मात्र निवड करण्यात आली नाही. हे पाहून निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर व निवड समितीवर टीका केली जात आहे. आता भारताचे माजी खेळाडू दिलीप वेंगसरकरदेखील संतापले आहेत.

माजी भारतीय कर्णधार दिलीप वेंगसरकर देखील आकिब नबीला संघात न घेतल्याने संतापले आहेत. अफगाणिस्तानविरुद्ध होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यासाठी संघ निवडताना जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीवर जोरदार टीका केली आहे. आकिब नबीने २०२५-२६ रणजी ट्रॉफी हंगामात अफलातून कामगिरी करत १० सामन्यांत १२.५६ च्या जबरदस्त सरासरीने तब्बल ६० विकेट्स घेतल्या आणि स्पर्धेतील सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. जम्मू-काश्मीरला पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी विजेतेपद मिळवून देण्यात त्याची मोठी भूमिका होती. या शानदार कामगिरीसाठी त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने गौरवण्यात आलं. २९ वर्षीय या गोलंदाजाने संपूर्ण हंगामात मॅचविनिंग कामगिरी केल्या. हुबळी येथे कर्नाटकविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्याच्या पहिल्या डावात त्याने ५४ धावांत ५ विकेट्स घेतल्या. कल्याणी येथे बंगालविरुद्धच्या उपांत्य फेरीत त्याने सामन्यात एकूण ९ विकेट्स घेत १२३ धावा दिल्या, तर इंदूरमध्ये मध्य प्रदेशविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीत तब्बल १२ विकेट्स घेत ११० धावा दिल्या. त्याच्या नावावर या हंगामात सात वेळा पाच विकेट्स आणि दोन वेळा चार विकेट्स घेण्याची कामगिरी नोंदवली गेली. अशी उत्कृष्ट कामगिरी असतानाही त्याची निवड न झाल्याने अनेक माजी खेळाडूंनी भारतीय संघाच्या निवड समितीवर टीका केली आहे.

# 'शिवरायांचा अवमान करण्याचा हेतू नव्हता'; व्हायरल व्हिडीओवरील वादानंतर रितेशने व्यक्त केली दिलगिरी

रितेश देशमुख दिग्दर्शित अभिनित 'राजा शिवाजी' या चित्रपटाला महाराष्ट्रभरातून भरभरून प्रेम आणि प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाच्या यशानंतर संपूर्ण टीमसाठी आयोजित करण्यात आलेल्या सक्सेस पार्टीतील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. या व्हिडीओमध्ये रितेश देशमुख बॉलिवूड गाण्यावर डान्स करताना दिसत असून त्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो असलेला टी-शर्ट परिधान केला होता. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर काही सोशल मीडिया युजर्सनी त्याच्यावर टीका करत शिवरायांचा अवमान केल्याचा आरोप केला.

याशिवाय, काहींनी रितेशने मद्यपान केल्याचाही आरोप केले. या सर्व आरोपांनंतर अखेर रितेश देशमुखने सोशल मीडियावर सविस्तर निवेदन जारी करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच, कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मनापासून दिलगिरीही व्यक्त केली आहे. रितेशने सोशल मिडियावर स्टोरीला ठेवलेल्या आपल्या निवेदनात म्हटले की, नमस्कार, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'राजा शिवाजी' चित्रपटाला प्रेक्षकांनी दिलेल्या अभूतपूर्व प्रतिसाद दिला. या







सिनेमाच्या यशाच्या आनंदानिमित्त आमच्या संपूर्ण टीमने एक छोटेखानी आनंदोत्सव आयोजित केला होता. त्यानंतर माझा एक व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. एक शिवप्रेमी या नात्यानं मी याचं स्पष्टीकरण देणं माझं कर्तव्य मानतो.

मी नम्रपणे स्पष्ट करू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा असलेला टी-शर्ट परिधान करून आनंद साजरा करण्यामागे त्यांचा अवमान करण्याचा माझा किंचितही हेतू नव्हता. तो टी-शर्ट मी चित्रपटाच्या प्रचारादरम्यान वापरत होतो. त्या दिवशीही मी प्रचारकार्य पूर्ण करून थेट कार्यक्रमात सहभागी झालो असल्याने टी-शर्ट बदलणं राहून गेलं. तसेच, माझ्याबाबत समाजमाध्यमांवर होत असलेल्या काही दाव्यांविषयीही स्पष्ट करू इच्छितो की, मी आजवर कधीही मद्यपान केलेले नाही आणि भविष्यातही करणार नाही. त्यामुळे या संदर्भातील कोणतेही आरोप वस्तुस्थितीला धरून नाहीत.

विशेष म्हणजे, हा व्हिडिओ चित्रित करणाऱ्या व्यक्तीला संबंधित कार्यक्रमाचं निमंत्रणदेखील देण्यात आलेलं नव्हतं. या कार्यक्रमाचं आयोजन 'राजा शिवाजी' या चित्रपटासाठी साडेतीन वर्षे अथक परिश्रम घेतलेल्या, कॅमेरामागील आणि कॅमेरासमोरील सर्व कलावंत व सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी करण्यात आलं होतं. तथापि, माझ्या त्या कृतीमुळे कुणाच्याही भावना दुखावल्या गेल्या असतील, तर एक शिवप्रेमी म्हणून मी मनःपूर्वक दिलगिरी व्यक्त करतो. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या सर्वांच्या श्रद्धेचे, प्रेरणेचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. त्यांच्याविषयी माझ्या मनात अत्यंत आदर, प्रेम आणि निष्ठा आहे. ही भावना आजही तितकीच दृढ आहे आणि कायम राहील. जय शिवराय! आपला, रितेश विलासराव देशमुख.

## रडत लाईव्ह आली अन् उचललं टोकाचं पाऊल; इन्फ्लुएंसर अनीता बिश्नोईचा लाईव्हमध्ये आत्महत्येचा प्रयत्न

सोशल मीडियावर दिसणार सगळच सत्य आणि सुंदर असतं असं नाही. सोशल मिडियाच्या झगमगाटामागे एक कटू वास्तव एक काळी बाजू देखील असते या काळ्याबाजूत अनेक इन्फ्लुएंसर हालाकीने आपलं आयुष्य जगत असतात.नुकतचं सोशल मीडियाच्या झगमगाटामागे दडलेली कटू वास्तवता पुन्हा एकदा समोर आलं आहे. राजस्थानमधील जोधपूर येथील सोशल मीडिया इन्फ्लुएंसर अनीता बिश्नोईशी संबंधित एक



धक्कादायक घटना सध्या चर्चेत आहे. सोशल मीडियावरील सततच्या ट्रोलिंगला कंटाळून तिने इन्स्टा लाईव्हवर येऊन विष प्राशन केल्याची घटना घडली. या घटनेनंतर सोशल मीडियावरील सायबर बुलिंग आणि मानसिक आरोग्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनीता बिश्नोई गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर प्रचंड ट्रोलिंगचा सामना करत होती. तिच्या एका ड्रेसवरून आणि सोशल मीडिया पोस्टवर तिला ट्रोल करण्यात आले होते. काहींनी त्यांच्याविरोधात रोस्ट व्हिडीओ तयार करून टीका केली. या सततच्या नकारात्मक प्रतिक्रियांमुळे त्या मानसिकदृष्ट्या खचली होती.

घटनेपूर्वी अनीताने सोशल मीडियावर लाईव्ह येत आपल्या भावना व्यक्त केल्या. या लाईव्हदरम्यान ती खूप भावुक झाली. ट्रोलिंगमुळे होणाऱ्या मानसिक त्रासाबद्दल बोलताना ती सोशल मिडियावर खूप रडली. अनीताने 'आता तुमची बहीण तुमच्यासोबत राहणार नाही...' असं म्हणत एक पोस्ट केली होती. या पोस्टनंतर काही वेळातच लाईव्ह येऊन तिने विष प्राशन केल्याची बातमी समोर आली. अनीताची प्रकृती बिघडल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

## वयाच्या साठीत तिसऱ्यांदा बोहल्यावर चढणार अमीर खान

आमिरच्या लग्नाची. अमीरने अनेकदा गौरी सोबत तो सिरीयस रिलेशनशिपमध्ये असल्याचे सांगितल्यानंतर अखेर तो त्यांच्या नात्याला नवे नाव देण्याच्या तयारीत आहे. वयाच्या ६१ व्या वर्षी अभिनेता आमिर खान तिसऱ्यांदा लग्न करणार आहे.

अमीर खान आणि त्याची प्रेयसी गौरी स्प्रॅट या दोघांच्या लग्नाची तारीखही समोर आली असून ५ जुलैला जवळच्या कुटुंबीयांसोबत आणि काही जवळच्या मित्रांचे उपस्थितीत ते त्यांच्या राहत्या घरीच नोंदणी पद्धतीने त्यांच्या नात्याला औपचारिक रूप देणार आहेत. यासंदर्भात दोघांकडूनही कोणतीही अधिकृत वक्तव्य समोर आलेले नाही. अमीर आणि गौरी गेल्या वर्षभरापेक्षा अधिक काळापासून आनंदाने एकत्र राहत आहेत.

अभिनेता आमिर खान त्याच्या खासगी आयुष्यामुळे कायमच चर्चेत असतो. त्याचे या आधीचे दोन्ही घटस्फोट आणि गौरी स्प्रॅटशी असलेल्या नात्याची कायमच चर्चा



झाली आहे. आमिर खानने पहिल्यांदा रीना दत्तासोबत आपली लग्नगाठ बांधली. रीनाशी घटस्फोट झाल्यानंतर आमिर खानने किरण रावशी लग्न केले. पण, आमिरचे दुसरे लग्नही फार काळ टिकले नाही. आमिर आणि किरण यांनी आपसी सहमतीने एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. अशातच आता किरण रावला घटस्फोट दिल्यानंतर आमिर खान तिसऱ्यांदा प्रेमात पडला. आमिर खानने स्वतः मीडियासमोर आपली गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटची सर्वांना ओळख करुन दिली. तसेच, आमिरने अनेकदा गौरीसोबत तो सीरिअस रिलेशनशिपमध्ये असल्याचे सांगितले आणि आता तो तिच्याशी लग्नही करणार आहे.



## RCB जिंकल्यानंतर नुसरत भरुचा ट्रोल, 'त्या' आवाजाबाबत अभिनेत्रीचा खुलासा

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नुसरत भरुचा सध्या सोशल मीडियावरील एका व्हायरल व्हिडिओमुळे चर्चेत आली आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगलोर (RCB) संघाने IPL 2026 चे विजेतेपद जिंकल्यानंतर आनंद व्यक्त करण्यासाठी नुसरतने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडिओ शेअर केला होता. मात्र, या व्हिडिओच्या बॅकग्राउंडला ऐकू आलेल्या आवाजाचा काही सोशल मीडिया युजर्सनी वेगळाच अर्थ लावला आणि अभिनेत्रीवर प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली.

ट्रोलिंग वाढल्यामुळे नुसरतने सोशल मीडियावर सविस्तर स्पष्टीकरण देत संपूर्ण घटनेमागील सत्य मांडले. इंस्टाग्राम स्टोरीजवर तिने काही व्हिडिओ आणि फोटो शेअर करत त्या आवाजाचा खुलासा केला. नुसरतच्या म्हणण्यानुसार, व्हिडिओमध्ये ऐकू येणारा आवाज हा कोणत्याही व्यक्तिचा नसून एका लहान कुत्र्याच्या पिल्लाचा होता. तिने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, काही लोकांनी या प्रकरणात मर्यादा ओलांडल्या आहेत. एका कुत्र्याच्या पिल्लाच्या रडण्याच्या आवाजावरून नकोत्या चर्चा रंगल्या आहेत. इतकेच नव्हे तर काहींनी तिच्या नावाने खोटे स्पष्टीकरणही पसरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अभिनेत्रीने केला. नुसरतने पुढे सांगितले की, मी एका मित्राच्या घरी RCBचा सामना पाहत होती. त्या घरात असलेल्या कुत्र्याचे पिल्लू सतत रडण्यासारखे आवाज काढत होते. याच वेळी माझ्या मित्राने व्हिडिओ रेकॉर्ड केला होता. तो व्हिडिओ तिने शेअर केला. चर्चा अधिक रंगू नये म्हणून मी व्हिडिओ स्टोरीवरून हटवला होता. मला नेमके याच प्रकारच्या गैरसमजाची भीती वाटत होती. त्यामुळेच मला तो व्हिडिओ हटवण्याचा सल्ला देण्यात आला आणि मी तो मान्य केला," असे तिने स्पष्ट केले. या व्हिडिओमुळे तिला ट्रोलिंग करणाऱ्यांवरही अभिनेत्रीने नाराजी व्यक्त केली. सोशल मीडियावर मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरवापर करू नका, गोष्टींचा चुकीचा अर्थ लावू नका आणि कोणतीही माहिती पडताळणी न करता त्यावर विश्वास ठेवू नका, असे आवाहन तिने केले.

# बुलडाणा तालुक्यातील ५१ ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. बुलडाणा तालुक्यातील ५१ ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दि. १० जून व ११ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षणाची सोडत काढण्यात येणार असून प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडणार आहे. आरक्षण सोडतीच्या सभेला तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक उमेदवार तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी तहसीलदार एस. एन. वाघ यांनी केले आहे. दि. १० जून २०२६ रोजी सावळी, जनुना, बिरसिंगपूर, डोमरूळ, केसापूर, बोरखेड, रुईखेड टेकाळे, कोलवड, देवपूर, जांब, भादोला, अजिसपूर, भडगाव, म्हसला बु., सिंदखेड, पळसखेड भट, धामणगाव, मद, तांदूळवाडी, देऊळघाट, माळवंडी, रायपूर, कुंबेफळ, जामठी, धाड, चांडोळ आणि शिरपूर या ग्रामपंचायतींची आरक्षण सोडत होणार आहे. तर दि. ११ जून २०२६ रोजी वरुड, दहिद बु., पळसखेड नाईक, तराडखेड, डोंगरखंडाळा, कुलमखेड, दुधा, वरवंड, साखळी बु., खुपगाव, सागवन, मातला, पांग्री, सोयगाव, चौथा, पाडळी, अंभोडा, नांद्राकोळी, दहिद खु., गुम्मी, हतेडी बु., सातगाव, मासरूळ आणि माळविहीर या ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमामुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या प्रक्रियेला वेग मिळणार असून आरक्षण निश्चित झाल्यानंतर निवडणूक तयारीला सुरुवात होणार आहे. नागरिकांनी या प्रक्रियेची नोंद घेऊन संबंधित ग्रामपंचायत स्तरावरील सभांमध्ये उपस्थित राहावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

# अमृतमार्फत टायपिंग व शॉर्टहँड प्रशिक्षणासाठी ८ जूनपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले

जनसंचलन/बुलढाणा

शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या माध्यमातून टायपिंग व शॉर्टहँड प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहे. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील पात्र विद्यार्थी तसेच युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेण्यासाठी दि. ८ जून २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन अमृत कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. सध्या अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन व पेपरलेस पद्धतीने राबविण्यात येत असून इच्छुक उमेदवारांनी अर्ज करताना आवश्यक माहिती व कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे आवश्यक आहे. टायपिंग व शॉर्टहँड हे रोजगाराभिमुख कौशल्य मानले जाते. शासन, निमशासकीय, न्यायालयीन तसेच खासगी क्षेत्रातील विविध रोजगार संधींसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील पात्र विद्यार्थी व युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, फ्लॅट क्रमांक ३०५, तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालयासमोर, बुलढाणा ४४३००१ येथे किंवा जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमाणी यांच्याशी ९१११२२२७६३७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# गृह(शहरे) व महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांचा मेहकर तालुका दौरा...

जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे गृह(शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश ज्योती रामदास कदम हे सोमवार दि. ८ जुन २०२६ रोजी ता. मेहकर जि. बुलढाणा येथे विविध उद्घाटन व लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहणार आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सोमवार दि. ८ जुन रोजी सकाळी ११.४५ वाजता मुंबई येथून शासकीय विश्रामगृह मेहकर येथे आगमन. दुपारी १२ वाजता शिवाजी नगर, मेहकर येथे अद्यावत अभ्यासिकेचे उद्घाटन व लोकार्पण सोहळयास उपस्थिती. दुपारी १२.३० वाजता तलाठी कार्यालय व महसूल कार्यालय लोकार्पण सोहळयास उपस्थिती. दुपारी १ वाजता मेहकर पोलीस स्टेशन नविन इमारत व दुपारी २ वाजता मेहकर पंचायत समिती प्रशासकीय इमारतीचे भव्य लोकार्पण सोहळयास उपस्थिती. दुपारी ३.३० वाजता पंचायत समिती ता. मेहकर जि.बुलढाणा येथून समृद्धी महामार्गाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा मेहकर तालुका दौरा; बसस्थानकाचे उद्घाटन



जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे रविवार दि. ७ जुन २०२६ रोजी ता. मेहकर जि. बुलढाणा दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार रविवार दि. ७ जुन रोजी दुपारी ३ वाजता ठाणे येथून शासकीय विश्रामगृह मेहकर येथे आगमन व राखीव. दुपारी ४ वाजता मेहकर बसस्थानक जि.बुलढाणा येथे आगमन व बसस्थानकाच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ५ वाजता अमरावतीकडे प्रयाण करतील.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी खामगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाची विशेष मोहीम

## ८ ते २० जूनदरम्यान स्कूल बसची फेरतपासणी नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा




जनसंचलन/ चिखली

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी खामगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सर्व स्कूल बसांची फेरतपासणीसाठी विशेष मोहीम राबविली जाणार आहे. ही मोहिम दि. ८ ते २० जून २०२६ दरम्यान होणार असून सर्व स्कूल बस चालक, मालक व शैक्षणिक संस्थांनी आपल्या शाळास्तरीय स्कूल बस सुरक्षितता समितीशी संपर्क साधावा किंवा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, खामगाव येथे आवश्यक फेरतपासणी करून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागामार्फत करण्यात आले आहे. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या जनहित याचिका क्र. ९७/२०१६ मधील दि. १७ डिसेंबर २०१९ च्या आदेशानुसार तसेच स्कूल बस नियमावली २०११ अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सर्व स्कूल बसांची फेरतपासणी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, खामगाव यांच्या वतीने दि. ८ जून २०२६ ते २० जून २०२६ या कालावधीत होणार असून आवश्यक फेरतपासणी करून घ्यावी. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने बसची तांत्रिक तपासणी, सुरक्षा साधनांची उपलब्धता तसेच नियमांचे पालन याची खातरजमा करण्यात येणार आहे. फेरतपासणी पूर्ण झाल्यानंतरच शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच दि. १ जुलै २०२६ नंतरही फेरतपासणी न केलेल्या स्कूल बसेसविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, खामगाव यांनी दिला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व संबंधितांनी वेळेत फेरतपासणी करून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# बुलढाणा PWD मध्ये नेमकं चाललय तरी काय?

# एकाच दिव्यांग लिपिकाकडे ५ टेबलांचा कारभार...

## कार्यकारी अभियंत्यांचा लाडका कोण?



**जनसंचलन/बुलढाणा**

येथील सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला असून कार्यालयीन कामकाजातील कथित अनियमिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विभागात पुरेसे कर्मचारी उपलब्ध असतानाही एका दिव्यांग लिपिकाकडे तब्बल पाच महत्त्वाच्या टेबलांचा कार्यभार सोपविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे इतर कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून कार्यकारी अभियंता जितेंद्र काळे यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित लिपिक गेल्या बारा वर्षांपासून मुख्य कार्यालयात कार्यरत असून त्याच्याकडे लेखा, अर्थ, निविदा, भाडे आणि कंत्राटदार नोंदणीसारखी महत्त्वाची टेबल देण्यात आली आहेत. एकाच कर्मचाऱ्याकडे एवढा मोठा आणि संवेदनशील कार्यभार कसा देण्यात आला, याबाबत विभागातच कुजबुज सुरू आहे. विशेष म्हणजे या टेबलांमागे आर्थिक हितसंबंध असल्याची चर्चाही विभागीय वर्तुळात रंगली आहे. दुसरीकडे, कार्यालयातील तीन लिपिकांकडे गेल्या अनेक महिन्यांपासून कोणताही कार्यभार नसल्याची माहिती समोर आली आहे. एका कर्मचाऱ्याकडे आठ महिन्यांपासून, दुसऱ्याकडे पाच महिन्यांपासून तर तिसऱ्याकडे दोन महिन्यांपासून कोणतेही टेबल नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे हे कर्मचारी अक्षरशः काम मागत फिरत असल्याची चर्चा आहे. दरम्यान, निविदा प्रक्रिया आणि कंत्राटदार नोंदणीसाठी वापरण्यात येणाऱ्या डिजिटल सिग्नेचर (पीडब्ल्यूडी) चा वापर कार्यालयाबाहेरील खासगी संगणक केंद्रांवर होत असल्याचाही गंभीर आरोप समोर आला आहे. जर हे आरोप खरे असतील तर संपूर्ण निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. बदल्यांचा हंगाम सुरू असताना सोयीच्या जागा आधीच फिक्स करण्यात आल्याची चर्चा विभागात रंगली आहे. या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार का आणि प्रशासन याकडे गांभीर्याने पाहणार का, याकडे आता कर्मचाऱ्यांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# एसपी तांबे एसी मध्ये बसून आमची म्हणणाऱ्याला तामगाव पोलिसांचा दणका; फेसबुक पोस्ट भोवली!

# रिझल्ट हवाय आम्हाला म्हणत कर्तव्यदक्ष तांबेंवर अश्लील पोस्ट; विशाल बकालवर तामगाव पोलिसांत गुन्हा!




**जनसंचलन/ तामगाव**

सोशल मीडियावर पोलीस प्रशासनाची बदनामी करणारी अश्लील व आक्षेपार्ह पोस्ट टाकणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. बुलढाणा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या नावाचा उल्लेख करत फेसबुकवर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी तामगाव पोलिसांनी विशाल विनायक बकाल, रा. वरवट बकाल, ता. संग्रामपूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता पोलीस स्टेशन तामगाव येथील गोपनीय विभागात कार्यरत पोलीस कर्मचारी मनिष त्र्यंबक वानखडे हे कामकाज करीत असताना त्यांना मोबाईलवर फेसबुकवरील एक पोस्ट निदर्शनास आली. ट्रिपल व्ही बकालफ या नावाच्या फेसबुक अकाऊंटवरून बुलढाणा पोलीस अधीक्षक तांबे साहेबांबाबत अत्यंत अश्लील व बदनामीकारक मजकूर पोस्ट करण्यात आल्याचे आढळले. ही पोस्ट पाहताच पोलिसांनी तत्काळ वरिष्ठांना माहिती दिली. त्यानंतर ठाणेदारांनी स्वतः पोस्टची खात्री करून आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलिसांच्या मते, जिल्ह्याच्या पोलीस प्रमुखांविषयी अशा प्रकारचा मजकूर प्रसारित करणे म्हणजे केवळ एका अधिकाऱ्याची नव्हे, तर संपूर्ण पोलीस यंत्रणेची प्रतिमा मलिन करण्याचा प्रकार आहे. या प्रकरणी तामगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम २९६ आणि ३५६(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विलास ज्ञानेश्वर बोपते यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. सोशल मीडियावर बेफाम लिहिणाऱ्यांसाठी हा प्रकार मोठा इशारा मानला जात आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अश्लीलता, अपमान आणि बदनामी केली तर पोलिसांचा कायद्याचा बडगा कधीही उगारला जाऊ शकतो, हे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

### बनावट हत्याकांडावरून जयश्री शेळके आक्रमक

# जळगाव जामोद पोलीस स्टेशनमध्ये अधिकाऱ्यांना धरले धारेवर!

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

येथील कथित शिवानी कळमेकर बनावट हत्याकांड प्रकरणाने आता पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. या प्रकरणाला एक महिना उलटून गेला तरी मूळ अनोळखी महिलेच्या मृतदेहाची ओळख पटवण्यात पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे बुलढाणा पोलिसांच्या तपासावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी आज जळगाव जामोद पोलीस स्टेशनला भेट देत पोलीस अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. कथित खोट्या हत्याकांडात दोन निष्पाप आदिवासी पिता-पुत्रांना तब्बल २२ दिवस कारागृहात डांबून ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा देणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे,फ्फ अशी आक्रमक मागणी शेळके यांनी केली. या संपूर्ण प्रकरणामुळे बुलढाण्याचे नाव राज्यभरात बदनाम झाले असून, पोलिसांचा मनमानी कारभार नेमका



कोणाच्या वरदहस्ताने सुरू आहे, असा थेट सवालही त्यांनी उपस्थित केला. गृहमंत्र्यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून दोषी अधिकाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी जयश्री शेळके यांनी केली. दरम्यान, पोलीस स्टेशनमध्ये अधिकाऱ्यांकडून माहिती घेताना शेळके यांनी प्रश्नांची सरबत्ती केली. मूळ मृतदेह कोणाचा? त्याची ओळख का पटली नाही? निष्पापांना तुरुंगात का ठेवले? तपासातील चूक कुणाची? अशा थेट प्रश्नांनी पोलीस अधिकारीही काही काळ निरुत्तर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या प्रकरणाने बुलढाणा जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्न निर्माण केले असून, आता दोषींवर कारवाई होते की प्रकरण पुन्हा दडपले जाते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८